# उल्हासनगर महानगरपालिका

जा. क्र. उमपा/कर विभाग/यु.क्र.०६/ 152 /२०२४

दिनांक . ~~१२/२०२१~~ 29/02/24

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र.४०सीओ०१२३४४६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन श्री. डी.टी. लढे अशी नोंद आहे.

परंतु श्री. डी.टी. लढे , रा— ब्लॉक नं.४९७.सर्वानंद को.ओ हौ.सो.लि.फलॉट नं.१०२ अे. विंग.लालचक्की उल्हासनगर—४ यांनी दिनांक १८/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये ते संरक्षण दलात कार्यरत होते. त्याअनुशंगाने शासन निर्णयानुसार त्यांचे नावावर असलेल्या मिळकतीस मालमत्ता करात सवलत देणेबाबत कळविले आहे. सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केली आहेत.

७. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे यांचेकडील टोकन क्र. १९४७/झेडएसडब्ल्यूओ/ठाणे/२०२०, दिनांक १४/१२/२०१८ रोजी माजी सैनिकांसाठी मालमत्ता करातून सवलत मिळणेबाबत जारी करण्यात आलेले पात्रता प्रमाणपत्र.

८. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडील ओळखपत्र

९. श्री. डी.टी. लढे यांचे सैनिक सर्टिफिकेट १०.आधार कार्ड ११. रेशन कार्ड १२. गॅस पावती १३ लाईट बिल इत्यादी कागदपत्र सादर केलेली आहेत.

शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक—संकिर्ण—२०१६/प्र.क्र.५९/नवि—२०, दि. ५/४/२०१६ व दि. ७/४/२०१६ नुसार माजी सैनिक त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. सदर निर्णया नुसार कर माफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ४०सीओ०१२३४४६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन डी.टी. लढे अशी नोंद असुन त्यांनी मालमत्ता करात सुट देणेकामी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे यांचेकडील पत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८अ मधील तरतूदीनुसार मालमत्ता करांत, पाणीपटटी पाणीपुरवठा लाभकर, मलप्रवाह कर, मलप्रवाह सुविधा लाभकर, विषेश सफाईकर, सर्वसाधारण कर(अग्निषमन करासह),महानगरपालिका शिक्षण कर, पथकर या करांचा समावेष आहे.तसेच महानगरपालिका मालमत्ता कराचे बिलांत शासकीय शिक्षणकर व रोजगार हमी उपकर, पथकर, मोठया निवासी जागेवरील कर व वृक्ष कर इ. समाविष्ठ आहेत, त्यापैकी,

अ) शिक्षणकर व रोजगार हमी उपकर या कराची महाराष्ट शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ अंतर्गत करण्यात येते.

ब) मोठया निवासी जागेवरील कर या कराची आकारणी महाराष्ट्र इमारतीवरील कर (मोठया निवासी जागासह)

(पुन्हा अधिनियम करणे) अधिनियम १९४७ मधील तरतूदीनुसार करण्यात येते.

क) वृक्ष कर या कराची आकारणी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम ,१९७५ मधील तरतूदीनुसार करण्यात येते.

वरीलप्रमाणे अ,ब,क मध्ये नमूद कर महाराष्ट महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८ अ मधील तरतूदीनुसार करण्यात येत नाहीत.

सबब, दि.०५/०४/२०१६ ,दि. ०९/०१/२०१७ व दि. २३/११/२०२० रोजीचे शासन निर्णयानुसार मालमत्ता क्र. ४०सीओ०१२३४४६०० करीता वर्ष २०२३—२४ मध्ये शासकीय शिक्षण कर व वृक्ष कर वगळता उर्वरीत सर्व करात सुट देवुन सुधारीत बिल जारी करणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. तसेच थकबाकी मध्ये कोणत्याही प्रकारची सुट अनुज्ञेय असणार नाही.

यास्तव मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्रमांक— संकिर्ण—२०१६/प्र.क्र.५९/नवि—२०, दि. ७/४/२०१६ व ०९/०१/२०१७ व सामान्य प्रषासन विभाग क्रमांक— संकिर्ण २०२०/ प्र.क्र. १०१/भाग२/का२८ दि. २३/११/२०२० नुसार उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ४०सीओ०१२३४४६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता करीता चालु आर्थिक वर्ष २०२३—२०२४ मध्ये शासकीय शिक्षणकर व वृक्ष कर वगळता उर्वरीत सर्व मालमत्ता करात सुट देवुन सुधारीत बिल जारी करावे.

२) मालमत्ता कर बिलातील थकबाकी मध्ये कोणत्याही प्रकारची सुट अनुज्ञेय असणार नाही.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:—

५. कोल्बो कं. नागपुर

६. श्री. डी.टी. लढे, रा— ब्लॉक नं.४९७.सर्वानंद को.ओ हौ.सो.लि.फलॅट नं.१०२ अे. विंग.लालचक्की उल्हासनगर—४